# तेलंगणा आणि विदर्भ – एक तुलना

– प्राचार्य डॉ. बाळ कांबळे
कर्जत

तेलंगणा हे स्वतंत्र राज्य म्हणून २ जून २०१४ रोजी अस्तित्वात आले, त्यावेळी व त्यानंतरही विदर्भ राज्याच्या मागणीचा प्रश्न सातत्याने पुढे आलेला दिसला नाही. केंद्रामध्ये भाजप सरकार आहे व ते छोट्या राज्यांच्या निर्मितीला प्रोत्साहन देणारे आहे परंतु विदर्भातील तरुण नेते श्री. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी काही प्रमाणात मागे पडली आहे. तेलंगणा स्वतंत्र राज्य का निर्माण होऊ शकले पण विदर्भ स्वतंत्र राज्य का निर्माण होऊ शकत नाही, याबद्दल या लेखात खालील मुद्दयांच्या आधारावर चर्चा केली आहे.

**१) मूळ राज्यनिर्मितीवेळचे प्रवाह :–** तेलंगणा हा प्रदेश तेलगू भाषक आहे. मात्र राज्यनिर्मितीपूर्वी या भागाचा उर्वरित आंध्रशी प्रशासकीय संबंध नव्हता. तेलंगणा हा प्रदेश स्वातंत्र्यापूर्वी हैदराबादच्या निजामाच्या राजवटीखाली होता. भाषावार प्रांतरचनेत तेलंगणा आंध्रचा भाग झाला तरी तेलंगणा वेगळा असावा अशी मागणी झालेली होती.

एकत्रित आंध्र प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री अथवा उपमुख्यमंत्री तेलंगणामधील असावेत अशी तरतूद असणारा करार आंध्र प्रदेश निर्मितीवेळी झाला होता. मात्र 'जंटलमन्स ॲग्रीमेंट' या नावाने ओळखला जाणारा हा करार पाळला गेला नाही. त्यामुळेच तेलंगणामधल्या जनतेच्या मनातील अन्यायाची भावना कायम राहिली. हैद्राबाद मधल्या विद्यापीठासारख्या शैक्षणिक संस्था या प्रश्नांची धग कायम ठेवण्याचे केंद्र झाल्या. स्वतंत्र विदर्भाच्या मागणी संदर्भात विचार करता विद्यापीठ किंवा विद्यार्थी आंदोलनांनी मोठी भूमिका बजाविल्याचे ठळकपणे दिसत नाही.

तेलंगणा आंध्रशी पूर्णपणे कधीही एकरूप होऊ शकले नाही. किंबहुना आंध्रच्या नेत्यांनी तशी भूमिका घेतलेली दिसत नाही. आंध्र राज्य निर्मितीवेळी पंडित नेहरू म्हणाले होते. ''एकत्र राहणे लग्नासारखे आहे. यामध्ये चांगल्या वाईट दोन्ही बाबी असणार, एकमेकांना समजावून घ्यावे. एकमेकांवर थोपवू नये.'' प्रत्यक्षात ही अपेक्षा पाळली गेली नाही. तेलंगणा मधल्या जनतेच्या खानपानाच्या सवयीसुद्धा बदलवण्याचा प्रयत्न केला गेल्याचे दिसते. तेलंगणामध्ये ज्वारी-बाजरी हा खाद्यसंस्कृतीचा भाग होता. सरकारने मात्र रेशनवर केवळ तांदूळ दिला.

**विदर्भ –** उर्वरित महाराष्ट्राच्या संदर्भातही मर्यादित प्रमाणात अशी परिस्थिती दिसते. दोन्ही प्रदेशांची भाषा एक मात्र सांस्कृतिक फरक दिसून येतो. अभ्यासकांच्या मते या दोन्ही भागांच्या सांस्कृतिक, सामाजिक, प्रशासकीय इतिहासात फरक आहे. या दोन प्रदेशातील बोलीभाषेत फरक आहे. तसेच जमीन महसुली व्यवस्थेतही फरक आहे.

मध्य प्रांत वऱ्हाड (सेंट्रल प्रॉव्हिन्स सी. पी. ॲंड बेरार) या ब्रिटिशकालीन राज्यनिर्मितीवेळीच नागपूर वऱ्हाडच्या आठ जिल्ह्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे, अशी मागणी पुढे आली होती. १ नोव्हेंबर १९३८ रोजी बॅ.रामराव देशमुखांनी मांडलेला विदर्भ प्रदेश निर्मितीचा ठरावही मध्यप्रांत वऱ्हाडच्या विधानसभेत संमत झाला होता. १८ ऑगस्ट १९४० रोजी बॅ.देशमुख यांच्याच नेतृत्वा खाली 'महाविदर्भ सभा' या संघटनेची स्थापनाही झाली होती.

**२) आंदोलनाचा पहिला टप्पा :–** उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शासकीय नोकऱ्यांतील भेदभावाविरुद्ध आंदोलन उभारले (डिसेंबर १९६८) हे आंदोलन राज्याच्या इतर भागातही पसरले. १९६९ मध्ये तेलंगणा प्रजा समितीची स्थापना करण्यात आली. स्वतंत्र तेलंगणा राज्य निर्मिती हा या समितीच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश होता. समितीने स्वतंत्र तेलंगणासाठी मोठे आंदोलन केले. १९७१ च्या निवडणुकीत तेलंगणा प्रजा समितीने १४ पैकी १० जागा जिंकल्या. विदर्भातही १९५७ च्या निवडणुकीत 'नाग-विदर्भ आंदोलन समितीने' स्वतंत्रपणे निवडणुका लढविल्या. पण त्यांचा पराभव झाला. १९७०-८५ या काळात जांबुवंतराव धोटे यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याचे आंदोलन तीव्र केले. हे आंदोलन विदर्भाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचले. त्यावेळी विदर्भ राज्य समितीचे १२ आमदार निवडून आले.

**३) तेलंगणा, विदर्भ आणि इंदिरा गांधींची भूमिका :–** १९६९ च्या तेलंगणा प्रजा समितीच्या आंदोलनास हिंसक वळण लागले. पोलीस गोळीबारात व हिंसाचारात ३६९ तरुणांचा मृत्यू झाला. कोणत्याही राज्याच्या निर्मितीमध्ये जनआंदोलनाबरोबरच केंद्रीय नेतृत्वाचीही भूमिका महत्त्वाची असते. उदा. १९५० ते १९६४ या काळात पंतप्रधान पंडित नेहरूंची भूमिका महत्त्वाची होती. त्यांच्यानंतर इंदिरा गांधींची भूमिका होती. १९६९ च्या तेलंगणा आंदोलनात पंतप्रधान इंदिरा गांधींनी स्वतंत्र तेलंगणाची मागणी फेटाळली. पंतप्रधान इंदिरा गांधींची भूमिका अनुकूल नाही हे पाहून तेलंगणा प्रजा समिती कॉंग्रेसमध्ये विलीन झाली.

विदर्भाच्या संदर्भातही असे दिसते की, इंदिरा गांधींच्या सत्ता आधारित गटबाजीच्या खेळात विदर्भवादी नासिकराव तिरपुडे, वसंतराव साठे, जांबुवंतराव धोटे यांच्यासारखी प्यादी वापरण्यात आली. त्यामुळे विदर्भाचे आंदोलन थंड झाले. इंदिरा गांधींनी जांबुवंतराव धोटेंना नागपूर लोकसभेची जागा दिली. धोटेंनी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला. परिणामी स्वतंत्र विदर्भ आंदोलनाचा जोर ओसरला.

**४) राज्यातील नेत्यांच्या भूमिका :–** स्वतंत्र विदर्भ व तेलंगणाच्या चळवळीमध्ये असे दिसते की, दोन्ही ठिकाणी चंद्रशेखरराव यांच्यासारखा एखादा अपवाद वगळता इतर नेत्यांच्या भूमिकांमध्ये सातत्य राहिलेले दिसत नाही.

१९६९ मध्ये चेन्ना रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली तेलंगणा प्रजा समिती निर्माण करण्यात आली. मात्र ही समिती व स्वत: डॉ. चेन्ना रेड्डी पुढे



CamScanner

काँग्रेसमध्ये सहभागी झाले. जुलै २००८ मध्ये द्रेवेंद्र गौड आणि पेदुरी रेड्डी यांनी तेलगू देशमचा राजीनामा देऊन 'नवतेलंगणा प्रजा पक्षा' ची (NTPP) स्थापना केली. अभिनेता चिरंजिवी यांनी प्रजा राज्य पक्ष (PRP) स्थापन केला. व तेलंगणा निर्मितीला पाठिंबा दिला. मात्र पुढे NTPP हा पक्ष PRP मध्ये सामील झाला व नंतर PRP चा विलय काँग्रेसमध्ये करण्यात आला. २००९ मध्ये चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसम पक्षाने तेलंगणाला पाठिंबा दिला व चंद्रशेखर राव यांच्या तेलंगणा राष्ट्र समितीबरोबर युती केली. मात्र प्रत्यक्षात हैदराबाद ही तेलंगणा राज्याची राजधानी राहील असे घोषित झाल्यावर डिसेंबर २००९ मध्ये चंद्राबाबू नायडू यांच्या तेलगू देसम पक्षाने तेलंगणाचे समर्थन मागे घेतले व अखंड आंध्रचे समर्थन केले.

बॅ. रामराव देशमुख हे बापूजी अणे यांच्यासोबत स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी लावून धरण्यात अग्रेसर होते. त्यांनी अकोला करारावर सही केली होती. मात्र नागपूर करारावेळी ते संयुक्त महाराष्ट्रवादी झाले. आबासाहेब खेडकर विदर्भवीर म्हणविले जाणारे जांबुवंतराव धोटे यांनी १९७८ मध्ये काँग्रेस पक्षात प्रवेश केला. स्वतंत्र तेलंगणासाठी मंत्रीपद सोडणारे, उपोषण करणारे, स्वतंत्र राज्याच्या मुद्यावर व्यापक जनसंघटन करणारे चंद्रशेखर राव यांच्यासारखे नेतृत्व विदर्भाला मिळालेले दिसत नाही. आबासाहेब खेडकर, मधुसूदन वैराळे हे विदर्भवादी नेते होते. पण ते पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने झालेले दिसतात. मारोतराव कन्नमवार हेही विदर्भवादी होते पण त्यांनी भूमिका बदललेली दिसते.

**५) राजकीय पक्ष, संघटनांची निर्मिती व स्वतंत्र राज्य चळवळ:–** तेलंगणा व विदर्भ या दोन्ही चळवळींमध्ये राजकीय संघटना, राजकीय पक्षांची निर्मिती झालेली दिसते. यापैकी काही संघटनांनी काही काळ प्रभावी भूमिका घेतलेली दिसते. तर काही पक्ष संघटनांचे काँग्रेससारख्या पक्षात विलीनीकरणही झालेले दिसते.

१९६९ मध्ये माजी केंद्रीय मंत्री डॉ. चेन्ना रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली तेलंगणा पृथक राज्य निर्मितीच्या पार्श्वभूमीवर तेलंगणा प्रजा समितीची स्थापना करण्यात आली. १९७१ च्या निवडणुकीत तेलंगणा प्रजा समितीने १४ पैकी १० जागा जिंकल्या. त्यानंतरही पंतप्रधानांचा पृथक राज्य निर्माण करण्याचा कल नाही हे पाहून तेलंगणा प्रजा समिती काँग्रेसमध्ये विलीन झाली.

जुलै २००८ मध्ये देवेंद्र गौड आणि पेदुरी रेड्डी यांनी तेलगू देशम पक्षाचा राजीनामा देऊन नव तेलंगणा प्रजा पक्षाची (NTPP) स्थापना केली. चित्रपट अभिनेता चिरंजिवी यांनी 'प्रजाराज्यम' पक्षाची स्थापना केली व तेलंगणा राज्याला पाठिंबा दिला. मात्र पुढे (NTPP) हा पक्ष 'प्रजाराज्यम' मध्ये सामील झाला व नंतर प्रजाराज्यम पक्ष काँग्रेसमध्ये सामील झाला.

विदर्भाचा विचार करता १८ ऑगस्ट १९४० रोजी बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली 'महाविदर्भ सभे'ची स्थापना करण्यात आली.

१९५७ ची विधानसभा निवडणूक 'नाग-विदर्भ आंदोलन समितीने' लढविली. मात्र या समितीचा निवडणुकीत पराभव झाला. १९७० ते १९८५ या काळात विदर्भवीर जांबुवंतराव धोटे यांनी 'विदर्भ राज्य समितीचे' १२ आमदार निवडून आणले. माजी उपमुख्यमंत्री नासिकराव तिरपुडे यांनी 'विदर्भ विकास महासभेची' स्थापना केली होती. १ सप्टेंबर २००० रोजी हिवाळी अधिवेशनात शासनाने वेगळ्या विदर्भाचा प्रस्ताव मंजूर करावा या मागणीसाठी विदर्भातील सर्वपक्षीय ५० माजी आमदारांनी 'माजी आमदार विदर्भ समिती' ची स्थापना केली. छत्तीसगड, झारखंडच्या निर्मितीच्या पार्श्वभूमीवर १५ नोव्हेंबर २००० रोजी लोकजागृती घडवून आणण्यासाठी 'विदर्भ राज्य संघर्ष समिती' 'विदर्भ राज्य गण परिषद' व 'विदर्भ मुक्ती मोर्चा' या संघटनांद्वारे विदर्भ राज्य निर्धार यात्रा काढण्यात आली.

मात्र तेलंगणाच्या निर्मितीसाठी कारणीभूत ठरलेल्या 'तेलंगणा राष्ट्र समिती' सारखा पक्ष विदर्भात निर्माण झाला नाही हे वास्तव आहे.

**६) विदर्भ, तेलंगणा चळवळी संदर्भात काँग्रेसची भूमिका:–** छोट्या राज्यांच्या चळवळींसंदर्भात काँग्रेस पक्षाची भूमिका नकारात्मक स्वरूपाची दिसते. विदर्भ व तेलंगणासाठी आंदोलन करणाऱ्या, राजीनामा देणाऱ्या नेत्यांना, चळवळी करणाऱ्या संघटनांना सत्तेत वाटा देऊन अशा नेत्यांना, संघटनांना थंड करण्याचाच काँग्रेसचा प्रयत्न राहिलेला दिसतो.

तेलंगणात सर्वप्रथम डॉ. चेन्ना रेड्डी यांच्या नेतृत्वाखालील तेलंगणा प्रजा समितीचा काँग्रेसमध्ये विलय करण्यात आला. २००८ मध्ये निर्माण झालेले नव तेलंगण प्रजा पक्ष व प्रजाराज्यम पक्ष पुढे काँग्रेसमध्ये विलीन झाले. प्रजाराज्यमचे नेते चिरंजिवी यांना काँग्रेसने केंद्रात मंत्रीपद दिले. तसेच यापूर्वीही तेलंगणा प्रजा समितीच्या विलयानंतर डॉ. चेन्ना रेड्डी यांना काँग्रेसने महत्त्वाची सत्तापदे दिलेली होती.

विदर्भामध्ये १९५७ च्या निवडणुकीनंतर स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसाठी आमदारांनी राजीनामे दिले. पंडित नेहरूंनी कन्नमवारांची समजूत घातल्याने काँग्रेसच्या निष्ठेपायी त्यांनी आपल्या आमदारांचा पाठिंबा दिला. पुढे कन्नमवारांची महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व मुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली. विदर्भवीर म्हणविल्या जाणाऱ्या जांबुवंतराव धोटेंना लोकसभेची जागा देऊन त्यांच्या फॉरवर्ड ब्लॉक या पक्षासही काँग्रेसमध्ये विलीन करण्यात आले.

**७) नेत्यांची दुटप्पी भूमिका :–** विदर्भवादी नेते वारंवार दुटप्पी भूमिका घेत आलेले आहेत. प्रभावी ठोस भूमिका एकाही नेत्याने घेतलेली नाही. काही नेत्यांनी द्वैभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाल्यावर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सहभाग घेतला होता. त्यांनी स्वतंत्र विदर्भाच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. काही नेत्यांनी विदर्भाच्या प्रश्नावरील निवडणुकीतील यशापयशाच्या संभाव्य शक्यतांचा विचार लक्षात घेऊन सत्ताधारी पक्षातील मंत्रीपदाला जादा पसंती दिल्याचे दिसते. तेलंगणामध्येही असे घडले पण चंद्रशेखर राव यांनी मात्र ठाम भूमिका घेतलेली दिसते.

**८) राजकीय सोय पाहून स्वतंत्र राज्याचे आंदोलन :–** विरोधी पक्ष सरकारला अडचणीत आणणारे सतत काही मागत असतो. तेलंगणा हा असा मुद्दा होता. २००१ साली तेव्हाच्या विरोधी पक्षनेत्या सोनिया गांधी यांनी पंतप्रधान वाजपेयी यांना पत्र लिहून स्वतंत्र तेलंगणाची मागणी केली. त्यावेळी आंध्र प्रदेशाचे चंद्राबाबू नायडू हे राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत होते व नायडूंच्या आंध्र प्रदेशामध्ये काँग्रेस सत्तेपासून दूर गेलेला होता. स्वतंत्र तेलंगणामागे ही राजकीय वस्तुस्थितीही होती. वास्तविक वाजपेयी सरकारपूर्वी देशात व आंध्रमध्येही दीर्घकाळ

काँग्रेसचेच राज्य होते. त्या काळात काँग्रेसने तेलंगणाचा प्रश्न प्रत्यक्षात अडगळीत टाकलेला होता. सत्ता गेल्यावर मात्र काँग्रेसला या मागणीची आठवण झाली. तेलंगणा राष्ट्र समितीची स्थापना चंद्रशेखर राव यांनी तेलंगणा प्रश्नावर चंद्राबाबूंची सोडलेली साथ, आणि काँग्रेसचे पत्र हे सारे २००१ या वर्षातले होते. हे इथे लक्षात घ्यायला हवे. म्हणजेच काँग्रेसपुरता विचार करता तरी तेलंगणा ही काँग्रेसची राजकीय सोय होती असेच म्हणावे लागते.

जे तेलंगणाचे तेच विदर्भाचे, १९९५ नंतर युती शासनाला अडचणीत आणण्यासाठी विदर्भातील काँग्रेस नेत्यांनी स्वतंत्र राज्याच्या मागणीचे हत्यार उचलले. वाजपेयी सरकारच्या काळात महाराष्ट्रातील काँग्रेस नेत्यांनी पंतप्रधान वाजपेयींची भेट घेऊन स्वतंत्र विदर्भाची मागणी केली. इथेही स्वत:चे राज्य नसताना काँग्रेसजनांनी मागणी केली ती राजकीय सोय पाहूनच केली हे लक्षात येते.

**९) नेतृत्वाची भूमिका : राजीनामा व उपोषण :-** आंध्र विधानसभेच्या १०० सदस्यांनी तेलंगणाच्या मागणीसाठी राजीनामे दिले. तेलंगण विभागातील १५ पैकी १२ मंत्र्यांनी, १७ पैकी १३ लोकसभा सदस्यांनी एक राज्यसभा सदस्य, २० विधान परिषद सदस्य यांनी तेलंगणा राज्याच्या निर्मितीच्या विलंबाविरुद्ध राजीनामे दिले. महाराष्ट्रात विदर्भाच्या मागणीसाठी इतक्या मोठ्या प्रमाणावर विदर्भातील सदस्यांनी राजीनामे दिलेले दिसत नाहीत.

२९ नोव्हेंबर २००९ रोजी टी.आर.एस.चे अध्यक्ष के. चंद्रशेखर राव यांनी संसदेमध्ये सरकारने तेलंगणा राज्याचे विधेयक सादर करावे म्हणून आमरण उपोषण केले. ११ दिवसांच्या उपोषणानंतर त्यांची प्रकृती खालावली. सरकारने राव यांचे उपोषण व तेलंगणातील व्यापक जनआंदोलनाचा विचार करून ९ डिसेंबर २००९ रोजी तेलंगणा निर्मितीस सुरुवात करण्याची घोषणा केली. महाराष्ट्रात स्वतंत्र विदर्भासाठी इतके कडवे नेतृत्व तयार झाले नाही व नेत्यांनी विदर्भासाठी स्वत:चे प्राण उपोषणाद्वारे पणाला लावल्याचे दिसत नाही.

स्वतंत्र विदर्भाची चळवळ नव्हे केवळ आंदोलन होते. चळवळींना सातत्य असावे लागते. आंदोलने स्थायी स्वरूपाची नसतात. तेलंगणा असेल किंवा महाराष्ट्र यासाठी चळवळ झाली. विदर्भाचा विचार करता, टप्प्याटप्प्याने, खंडितपणे आंदोलने होताना दिसतात. विदर्भाच्या चळवळीत समाजातील सर्व वर्गातील व थरातील व्यक्तींनी सहभागी व्हावे. सांस्कृतिक कार्यकर्त्यांनीही त्याला पाठिंबा द्यावा. अशी चळवळ विचारपूर्वक व्हावी. नियोजनबद्ध हवी. ही चळवळ दीर्घकाळ चालावी. इच्छाशक्तीचा दबाव निर्माण व्हावा. असे मत डॉ. श्रीपाद जोशी यांनी व्यक्त केले आहे.

विदर्भातील नेतृत्वाची विश्वासार्हता - जनतेला राजीनामे हवे असतील तर देऊ अशी भाषा योग्य नाही. नेतृत्वाची जनतेशी प्रतिबद्धता हवी. मात्र विदर्भातील नेत्यांच्या वरील स्वरूपाच्या भाषेमुळे त्यांच्या विश्वासार्हतेला तडा जातो.

**१०) व्यापक जनआंदोलन :-** स्वतंत्र तेलंगणा राज्यासाठी व्यापक जनआंदोलन उभे राहिल्याचे दिसते. चंद्रशेखर राव यांच्या आमरण उपोषणाच्या वेळी त्यांना तेलंगणामधील जनतेनेही उत्स्फूर्त पाठिंबा दिला. ६ व ७ डिसेंबर २००९ रोजी बंदचे आयोजन करण्यात आले. या बंदमध्ये विद्यार्थी संघटना, कामगार संघटना अशा अनेक संघटना सामील झाल्या. पुढे १७ फेब्रुवारी २०११ रोजी तेलंगणामधील शासकीय कर्मचाऱ्यांनी असहकार चळवळ सुरू केली. १६ दिवसांच्या चळवळीत ३ लाख कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. सरकारचे प्रत्येक दिवशी १०० कोटी रुपयांचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे सप्टेंबरमध्ये झालेल्या चळवळीत संपामुळे २५ दिवसात १४००० कोटी रुपयांचे नुकसान झाले.

हैद्राबाद येथे १० मार्च २०११ रोजी तेलंगणा संयुक्त कृती समितीने मिलीयन मार्चचे आयोजन केले. पोलिसांनी यापूर्वीच १०,००० कार्यकर्त्यांना अटक केली. तरीदेखील पोलिसांना हुलकावणी देऊन ५० ते ६० हजार लोक कार्यक्रम स्थळी पोहोचले.

१२ सप्टेंबर २०११ रोजी टी.आर.एस.ने करीमनगर येथे सार्वजनिक सभा भरविली. त्यात १० लाख लोकांपेक्षा जास्त लोकांनी भाग घेतला. १३ सप्टेंबर २०११ रोजी सर्व स्तरातील लोकांनी तेलंगणा निर्मितीसाठी आंदोलन केले. त्यात सरकारी कर्मचारी, वकील, खाणकामगार, आरोग्य कर्मचारी यांचा समावेश होता. त्यांनी बेमुदत संप पुकारला. काही दिवसातच या संपात शिक्षक, राज्य वाहतूक निगम कर्मचारी, विद्युत मंडळ, देवस्थान, सफाई कर्मचारी इत्यादी सामील झाले. या संपामुळे तेलंगणातील प्रशासन कोसळले. न्यायालयीन कामकाज खोळंबले. सिंगारेंच्या कोळसा खाणीतील संपामुळे दक्षिण भारतातील विद्युत पुरवठा खंडित झाला. २४ व २५ सप्टेंबर २०११ रोजी संपूर्ण तेलंगणात राष्ट्रीय व राज्य मार्ग अडविण्यात आले. रेल्वे अडविण्यात आल्या. वाहतूक व्यवस्था खोळंबविण्यासाठी ॲटो रिक्षा संघटनांनीही त्यात भाग घेतला. एकूणात हा सगळा संप १८ दिवस चालला. संपाचा परिणाम म्हणून अभूतपूर्व विद्युत पेचप्रसंग निर्माण झाला. पुढे ३० सप्टेंबर २०१२ रोजी 'तेलंगण मार्च' चे आयोजन करण्यात आले. यात २ लाख लोक सहभागी झाले. या सर्व व्यापक जनआंदोलनाचा परिणाम म्हणून काँग्रेस कार्यकारिणीने तेलंगणा राज्य निर्मितीस ३० जुलै २०१३ रोजी मंजुरी दिली.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात विदर्भासाठी इतक्या व्यापक जनसहभागाच्या अभूतपूर्व आंदोलनाची मालिका कधीच झालेली दिसत नाही.

**११) उपप्रदेशातील तीव्र संघर्ष :-** तीव्र स्वरूपाचा संघर्ष हे आंध्रच्या राजकारणाचे वैशिष्ट्ये राहिलेले आहे. सीमांध्र व तेलंगणा या दोन उपप्रदेशांमध्ये परस्परांबद्दल तीव्र विरोध व अविश्वास राहिलेला आहे. महाराष्ट्रात विदर्भ व उर्वरित प्रदेशात अशी स्थिती असल्याचे दिसत नाही.

**१२) स्वतंत्र विदर्भासंदर्भात प्रमुख राजकीय पक्षांच्या भूमिका:-** काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना, मनसे हे महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्ष आहेत. या सर्व पक्षांमध्ये स्वतंत्र विदर्भाच्या प्रश्नावर मतैक्य दिसत नाही. विदर्भातील काँग्रेस नेते सत्ता गेल्यावर स्वतंत्र विदर्भाच्या मुद्यावर आंदोलन करतात. मात्र केंद्रीय पातळीवर पक्षाने या विषयावर ठोस भूमिका घेतलेली दिसत नाही. २००४ साली पक्षाने दुसरा राज्यपुनर्रचना आयोग नेमण्याची घोषणा केली होती. मात्र हा आयोग प्रत्यक्षात आला नाही. राज्यपातळीवर पक्षाची मुंबई शहराची वेगळी काँग्रेस समिती आहे. मात्र विदर्भासाठी अशी कोणतीही रचना दिसत नाही. पक्षाने या मुद्यावर निवडणूक

लढविलेली दिसली नाही किंवा पक्षाच्या उमेदवाराचा तो प्रचाराचा मुद्दा राहिलेला दिसत नाही. विशेष म्हणजे केंद्रात व राज्यात सत्ता नसताना प्रतिस्पर्धी पक्षासमोर काँग्रेस नेत्यांनी मुद्दा मांडलेला दिसतो.

भारतीय जनता पक्ष छोट्या राज्यांच्या बाजूने आहे. मात्र एन.डी.ए. सरकारच्या काळात अन्य छोट्या राज्यांबरोबर विदर्भाचा मुद्दा हाती घेण्यात आला नाही. कारण राज्यातील मित्रपक्ष शिवसेना एकत्रित महाराष्ट्राचा पुरस्कार करतो व केंद्रातील तत्कालीन एन.डी.ए. सरकार तसेच राज्यातील युतीचे सरकार शिवसेनेच्या पाठिंब्यावर सत्तारूढ होते. यामुळे भाजपला या विषयात मर्यादा होत्या.

शिवसेना, मनसे हे पक्ष स्वतंत्र विदर्भाचा पुरस्कार करीत नाहीत. मात्र असे असले तरी या पक्षांना विदर्भातील जनतेने नाकारलेले नाही. विशेषत: शिवसेनेला विदर्भातून लोकसभा, विधानसभा पातळीवर प्रतिनिधीत्व मिळालेले आहे. तर मनसेला स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत विदर्भात काही ठिकाणी यश मिळालेले आहे. या पार्श्वभूमीवर विदर्भाच्या विरोधात असलेली शिवसेना व मनसेचे विदर्भात महत्त्व वाढत असेल तर आणि त्यांचे लोकप्रतिनिधी निवडून येत असतील तर विदर्भ कोणासाठी करावयाचा असा निराशावादी सूर जांबुवंतरावांनी व्यक्त केला.

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर भाजप नेत्यांनी स्वतंत्र विदर्भाच्या प्रश्नावर योग्य वेळ येऊ द्या अशी सूचक भूमिका घेतली आहे. ही योग्य वेळ कधी येईल? सध्या केंद्रात भाजपला स्वबळावर स्पष्ट बहुमत आहे. पंतप्रधानपदी कणखर नेतृत्व आहे. त्यामुळे विदर्भवाद्यांना आशा असू शकते.

मात्र असे असले तरी काही गोष्टींकडे दुर्लक्ष करता येणार नाही. विदर्भात काँग्रेस व भाजप यांच्यात प्रमुख राजकीय स्पर्धा राहिलेली आहे. राज्यातील इतर प्रदेशांचा विचार करता पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस, मराठवाड्यात शिवसेना यांचीही भूमिका महत्त्वाची असते. राज्यातील भाजप अथवा काँग्रेसच्या यशामध्ये विदर्भाचा वाटा मोठा राहिलेला असतो. अशावेळी हे दोन्ही पक्ष आपल्या सत्तेचा आधार असलेला प्रदेश सहजासहजी सोडून देतील का असा प्रश्न निर्माण होतो. राजीव गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीत त्यांना छोट्या राज्यांसंदर्भात अहवाल दिला होता. हा अहवाल पी.ए. संगमा यांनी तयार केला होता. या अहवालात विदर्भ व तेलंगणा राज्यांची शिफारस होती. मात्र विदर्भ वेगळा झाल्यास महाराष्ट्रातील सत्ता जाईल, अशी भीती विदर्भातील नेत्यांनी दाखविली व विषय तेथेच थांबला. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावरही १९५७ च्या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात समितीचा विजय झाला तरी विदर्भाने काँग्रेसची साथ सोडली नव्हती. द्विभाषिकात सत्तेवर येण्यात काँग्रेसला विदर्भाचा आधार उपयोगी ठरला होता, याची इथे आठवण होते. ही आठवण राज्यात मोठा भाऊ होऊ इच्छिणाऱ्या भाजपला नसेल असे कसे म्हणता येईल.

**विदर्भ, शिवसेना आणि स्वतंत्र भारत पक्ष –** शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेने स्वतंत्र भारत पक्षाची निर्मिती केली होती. हा पक्ष यापूर्वी महायुतीचा घटक पक्ष होता. शिवसेनेच्या पाठिंब्यावर स्वतंत्र भारत पक्षाचे शरद जोशी राज्यसभा सदस्य होते. स्वतंत्र भारत पक्षाचे शरद जोशी यांच्या मते विदर्भातील जिल्हे महाराष्ट्राचे भाग नव्हते. इतिहासाचा विचार करता विदर्भाचे स्वतंत्र अस्तित्व राहिलेले आहे. 'वऱ्हाड' म्हणून ओळखला जाणारा प्रदेश इंग्रज सरकारकडे भाडेपट्टीवर होता. हा भाग हैदराबादच्या निजामाकडून घेण्यात आला होता. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर पुन्हा निजामाकडे जायला नको हीच वऱ्हाडची भावना होती. तेथे स्वतंत्र विदर्भाचा आवाज आधीच निर्माण झाला. विदर्भातील शिवसैनिकांनीही विदर्भाला पाठिंबा दिलेला आहे. त्यामुळे विदर्भाची मागणी सेना नेतृत्वाला पटवून देता येऊ शकते.

**संदर्भग्रंथ –**


१. पळशीकर सुहास, मे २००९, भारताच्या राजकारणाचा ताळेबंद, मराठी वाचन साहित्य मालिका क्र.१, प्रगत अध्ययन केंद्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग पुणे, विद्यापीठ पुणे.
२. वासनिक अनिल, १४ ऑक्टो. २०१०, विदर्भ राज्य वास्तव आणि विपर्यास, श्री विद्या प्रकाशन, नागपूर.
३. किंमतकर मधुकर, डिसेंबर २०११, लोकराज्य विशेषांक (विदर्भ) अनुशेषाची सद्य:स्थिती, महाराष्ट्र शासन, मुंबई.
४. खांदेवाले श्रीनिवास, २०१२, विदर्भ राज्य संकल्पना, विद्या बुक्स, नागपूर.
५. जोशी श्रीपाद भालचंद्र, ४ जाने. २०१३, वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र? एका वादाची सद्य:स्थिती, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
६. लाव्हात्रे बबन, ६ डिसेंबर २०१२, विदर्भ राज्याचे खच्चीकरण, प्रबुध्द प्रकाशन, नागपूर.
७. चोले माधव, मे २०१२, छोट्या राज्यनिर्मितीचे वाढते बहुआयामी पेच, नवभारत, प्रज्ञापाठशाला मंडळ वाई संचलित मासिक.
८. द्वादशीवार सुरेश, १४ ऑगस्ट २०१०, तर विदर्भाने महाराष्ट्रासोबत राहायचे कशाला? साप्ताहिक साधना विशेषांक, पुणे,
९. किंमतकर मधुकर, १४ ऑगस्ट २०१०, भविष्यातील विकासाकरिता वेगळ्या विदर्भ राज्याशिवाय अन्य पर्याय नाही, विदर्भाला सुखी करा, साप्ताहिक साधना विशेषांक, पुणे.
१०. महाजन रत्नाकर, 'विदर्भ राज्य हे मृगजळ आहे त्या मागे धावू नका' साप्ताहिक साधना विशेषांक, १४ ऑगस्ट २०१०, पुणे.
११. 'तेलंगणा भारत का २९ वा राज्य' लेख, सप्टेंबर २०१३, क्रॉनिकल मासिक.
१२. धनागरे द.ना., स्वतंत्र विदर्भ राज्य ध्यास, विचार आणि चळवळ, जुलै २०११, नवभारत, सातारा.
१३. सकाळ न्यूज नेटवर्क, ३१ जुलै २०१३, पृष्ठ १
१४. महाराष्ट्र टाईम्स, ०५.०८.२०१३ औरंगाबाद.
१५. कांबळे बाळ, विदर्भ म्हणेल जय महाराष्ट्र, सकाळ, २३ नोव्हेंबर २०१३, पृष्ठ ५.
१६. कांबळे बाळ, छोट्या राज्यांचे 'उत्तर' प्रश्न वाढवेल, सकाळ, २३ नोव्हेंबर २०११, पृष्ठ ५.
१७. धोटे जांबुवंतराव, स्वतंत्र विदर्भाचे आंदोलन आता पुरे झाले, लोकसत्ता, २६ मार्च २०१३.
१८. Sanghatana, Shree Shakti, 1989, We were making History: Life Stories of Women in the Telengana People's, St.Martin's Press, New Delhi. (ISBN 0862326796)
१९. Telangana student wing leader arrested, The Times of India, 29 November 2011.
२०. Telangana: TRS wants more talks with Congress, The Times of India. 4-10-12
रिपोर्टस् :–
२१. SRC Submits report.
२२. Srikrishna Committee Report.
२३. Fact Finding Team on Vidharbha, Planning Commission, Govt. of India.

**वेबसाइटस् :-**

२४. "Andhra Pradesh News:JACurgesYSR to implement Go 610". Chennal, India: The Hindu 2004-05-25. http: www.hindu.com.2004/05/25stories 2004052503490500.htm.

२५. "Telangana Development forum-USA". Telangana org.http://www.telangana.org/Papers.asp. 2010-09-04

२६. "Common Minimum Programme of the congress led United Progressive Alliance". Indian National Congress. May 2004. Archived from the original 07 2007-12-12.http://web.archive.org./web/200712120848468.

२७. http://www.deccanchronicle. Com/Hyderabad-news/million-march-intensifies-in-hyderabad-statues-on-tank-bund-damaged-3283#tabs.

●●●